# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:14.06.2026** **वार:रविवार**

1. भारतीय लष्कराने भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज राहावे– राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं आवाहन.
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्स-स्लोव्हाकिया दौ-यावर; जी-7 परिषदेतही सहभागी होणार.
3. भीमाशंकर 'हेरिटेज वाडी' प्रकल्पामुळे पर्यटन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला नवी गती : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन.
4. नाशिक जिल्ह्यात पाणीटंचाई तीव्र; 179 टँकरद्वारे 654 ठिकाणी पाणीपुरवठा. आणि
5. पन्नास षटकांच्या पहिल्या सामन्यात भारताचा अफगाणिस्तांनवर विजय.

**<u>राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भारतीय लष्कराने बदलत्या सुरक्षा आव्हानांशी आणि तांत्रिक प्रगतीशी जुळवून घेत भविष्यासाठी सज्ज राहण्याची गरज व्यक्त केली. डेहराडून इथल्या इंडियन मिलिटरी अकादमीमध्येयेथे 158व्या नियमित आणि 141व्या तांत्रिक अभ्यासक्रमाच्या पासिंग आऊट परेडमध्ये त्या बोलत होत्या. अधिकारी छात्रांनी आयुष्यभर शिकण्याची वृत्ती, नैतिक मूल्ये आणि धैर्यपूर्ण नेतृत्व जोपासावे, असे आवाहन त्यांनी केले. देशाचे सार्वभौमत्व आणि अखंडतेचे रक्षक म्हणून जबाबदारी पार पाडण्याचा सल्लाही त्यांनी दिला.परेडमध्ये नऊ महिला छात्रांचा समावेश हा आयएमएच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा असल्याचे सांगत त्यांनी सर्व नवोदित अधिकारी आणि परदेशी छात्राचे अभिनंदन केले.

**<u>मोदी दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्स आणि स्लोव्हाकिया या दोन देशांच्या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात फ्रान्समधील 'नीस' शहरात काल दाखल झाले. या दौऱ्यादरम्यान, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्याशी चर्चा, 'भारत इनोव्हेट्स' उपक्रमाचा संयुक्तपणे शुभारंभ, महत्त्वाच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर विचारविनिमय तसंच G7 शिखर परिषदेत सहभाग असा पंतप्रधानांचा कार्यक्रम असेल. नीस शहरात भारतीय समुदायानं पंतप्रधानांचं अत्यंत उत्साहानं स्वागत केल्याबद्दल मोदी यांनी समाज माध्यमावरील एका पोस्टद्वारे त्यांचे आभार मानले. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्लोव्हाकिया भेटीमुळं दोन्ही देशांमधील सहकार्याच्या नवीन संधी उपलब्ध होतील आणि आर्थिक संबंध अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे.

**<u>चाचणी</u>**

'डीआरडीओ' अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने लांब पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांविरुद्ध बहु-स्तरीय संरक्षण आणि मध्यम पल्ल्यावरील जहाजांना लक्ष्य करणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या तीन यशस्वी चाचण्या घेतल्या. त्याबद्दल संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी डीआरडीओचं अभिनंदन केलं आहे. या चाचण्यांमुळे आक्रमक आणि प्रतिरोधक अशी क्षेपणास्त्र बाळगणाऱ्या  निवडक देशांमधे आता भारताची गणना होते असं सिंग यांनी समाज

माध्यमांवर म्हटलं आहे. नौदलाच्या मध्यम पल्ल्याच्या जहाज-विरोधी क्षेपणास्त्रांनीही आपली क्षमता सिद्ध केली आहे, असंही त्यांनी सांगितलं. या चाचण्यांद्वारे लांब आणि मध्यम पल्ल्याची क्षेपणास्त्र हवेतच नष्ट करण्याची क्षमता सिद्ध झाली आहे.

**<u>त्रिभाषा</u>**

केंद्रीय विद्यालय संघटन म्हणजेच केव्हीएसनं शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून इयत्ता सहावी आणि नववीच्या वर्गांसाठी त्रि-भाषा सूत्राअंतर्गत प्रत्येक शाळेत किमान एका तुकडीसाठी संस्कृत भाषा अनिवार्य केली आहे. बदली पात्र केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या मुलांची शैक्षणिक गैरसोय टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. नव्या नियमानुसार विद्यार्थ्यांनी निवडलेल्या तिसऱ्या भाषेच्या आधारे त्यांची वर्गवारी केली जाईल. दोन तुकड्या असलेल्या शाळांमध्ये एक संस्कृत आणि एक प्रादेशिक भाषेची तुकडी असेल, तर एकाच तुकडीच्या शाळांमध्ये किमान 15 विद्यार्थी असल्यास संस्कृतची स्वतंत्र तुकडी तयार करता येईल. दरम्यान, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ म्हणजेच सीबीएसईनंही राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 ला अनुसरून इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी तीन भाषांचा अभ्यास सक्तीचा केला आहे. यात किमान दोन भारतीय भाषा असणं अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांवरचा परीक्षेचा ताण कमी करण्यासाठी इयत्ता दहावीच्या पातळीवर या तिसऱ्या भाषेसाठी कोणतीही मंडळ परीक्षा घेतली जाणार नसल्याचं सीबीएसईनं स्पष्ट केलं.

**<u>भीमाशंकर वाडी</u>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रीक्षेत्रभीमाशंकर मंदिर परिसराच्या शाश्वत विकासासाठी प्रस्तावित 'भीमाशंकर हेरिटेज वाडी' प्रकल्पाच्या जागेची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रकल्पाचा आराखडा, पुनर्वसन प्रक्रिया आणि भाविकांसाठी प्रस्तावित सुविधांचा आढावा घेतला. या प्रकल्पामुळे भीमाशंकरच्या सांस्कृतिक वारशाचे जतन, ग्रामस्थांच्या जीवनमानात सुधारणा आणि पर्यटनाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करताना फडणवीस म्हणाले.....

**ही अशी जागा आहे की ज्या ठिकाणी वाईल्ड लाईफ आहे ज्या ठिकाणी प्रोटेक्टेड फॉरेस्ट आहे ज्या ठिकाणी बायोडायव्हर्सिटी आहे त्यामुळे कुठेही त्याला धक्का न लागता किंबहुना बायोडायव्हर्सिटी वाढवता कशी येईल फॉरेस्ट ला अधिक आपल्याला चालना कशी देता येईल असा विचार करून कॉरिडॉर तयार होतोय त्यामुळे हा नैसर्गिक कॉरिडॉर असेल हा सुंदर कॉरिडॉर असेल लोकांना अतिशय नैसर्गिक म्हणजे जे आपण म्हणतो की शिवशंकर कुठे असतात तर ते अशा ठिकाणी असतात की जिथे फक्त प्रसन्न वातावरण असतं जिथे निसर्ग असतो असा निसर्ग हा इथे पाहायला जातो.**

या सर्व विकासकामांमुळे भविष्यात भीमाशंकर येथे येणाऱ्या भाविकांची संख्या पाच ते दहा पट वाढेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.साडेदहा एकर क्षेत्रात उभारल्या जाणाऱ्या या प्रकल्पात 150 घरांचे नियोजित पुनर्वसन, 40 हून अधिक व्यावसायिक घटक, वारसा प्रवेशद्वार, सामुदायिक सभागृह, सार्वजनिक सुविधा केंद्र तसेच रोजगारनिर्मितीवर भर देण्यात येणार आहे. यावेळी फडणवीस यांच्या हस्ते भीमाशंकर येथील मुख्य मंदिरासमोर नव्याने बांधण्यात आलेल्या सभामंडपाच्या चावीच्या दगडाची विधिवत पूजा तसेच ब्रह्मध्वजारोहण करण्यात आले. यावेळी आमदार दिलीप वळसे-पाटील , जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मंदिराचे विश्वस्त आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

**ओपनडे**

पुण्यातील खडकवासला इथलं केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन केंद्र आज आपला 110 वा स्थापना दिवस साजरा करीत असून यानिमित्त केंद्राच्यावतीनंमुक्त दिनाचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रात देशातील विविध धरणांचा अभ्यास करण्यात येतो. या केंद्राबाबत अधिक माहिती देताना प्रभारी संचालक अनिल पुरोहित म्हणाले.....

**आमचे वैज्ञानिक संशोधन आणि अभियांत्रिकी उपाययोजना देशातील अत्यंत प्रतिष्ठित अशा महाप्रकल्पांसाठी अत्यंत उपयुक्त ठरल्या आहेत. मुंबई आणि जवाहरलाल नेहरू बंदर यांसारख्या प्रमुख सागरी केंद्रांचा विकास पंतप्रधान गती शक्ती कार्यक्रमाच्या अंतर्गत वाढवण इथले महत्त्वाकांक्षी ग्रीनफिल्ड महाबंदर तसेच मुंबईला नवी मुंबईशी जोडणारा अटल सेतू आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यासारख्या अभियांत्रिक क्षेत्रातील अद्भुत प्रकल्पांसाठी केलेले अभ्यास भारताच्या विकासाला बळकटी देत आहे आमचे विशेष अभियांत्रिकी मॉडल्स देशाच्या महत्त्वपूर्ण संरक्षण आणि जहाज बांधणी सुविधांमध्ये विशेषतः कोचीन इथं स्वदेशी बनावटीच्या आयएनएस विक्रांतच्या निर्मितीमध्ये मोलाची भूमिका बजावत आहे भारतात सहा हजारहून अधिक मोठ्या धरणी असून याबाबतीत भारत जगात तिसरा कामकार आहे त्यामुळे त्याची सुरक्षितता निश्चित करणे ही एक राष्ट्रीय प्राथमिकता आहे गेल्या 110 वर्षांपासून सीडब्ल्यू पॅरसने भारत तसंच अफगाणिस्तान भूतान आणि नेपाळ यासारख्या शेजारील देशांमधील धरणांच्या सुरक्षितेचं मूल्यांकन आणि पुनर्वसन करण्यासाठी प्रगत जल अभियांत्रिकी अभ्यास करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.**

**योग**

आंतरराष्ट्रीय योग दिन 2026 निमित्तआयुष मंत्रालयाच्यावतीने  आणिएका खाजगी कंपनीच्या संयुक्त विद्यमाने आज सकाळीपुणे, छत्रपती संभाजीनगर,नांदेडआदि ठिकाणी 6.15 ते 7.15 या वेळेत ऑनलाइन योग सत्र आयोजित करण्यात आलं आहे.

**मंदिर बंद**

पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्तीची होत असलेली झीज रोखण्यासाठी आणि मूर्तीचे दीर्घकालीन जतन आणि संवर्धन करण्यासाठी विशेष उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर 23 आणि 24 जून रोजी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर दर्शनासाठी बंद ठेवण्यात येणार आहे.

**निकाल**

सिंधुदुर्ग शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या एमबीबीएसच्या पहिल्या तुकडीने घवघवीत यश संपादन करत 98 पूर्णांक 94 टक्के निकालाची नोंद केली आहे. 95 पैकी 94 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. अधिष्ठाता डॉ. अनंत दवंगे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**पतसंस्था**

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदीॲड. दीपक पटवर्धन यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सहकारी पतसंस्था चळवळ अधिक विश्वासार्ह होण्याकरिता अभ्यासपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम आणि विभागवार उपकेंद्रं उभरण्यावर भर देणार असल्याचं पटवर्धन यांनी म्हटलं आहे.

**<u>सन्मान</u>**

संगीत नाटक अकादमी, संस्कृती मंत्रालय, भारत सरकार यांच्यावतीने प्रदान करण्यात येणारा उस्ताद बिस्मिल्ला खान युवा पुरस्कार-2024 महाराष्ट्रातील युवा ठाकर आदिवासी लोककलावंत बाळकृष्ण गणपत मसगे यांना जाहीर झाला आहे. कळसूत्री बाहुल्या आणि चित्रकथी यांसारख्या लोप पावत चाललेल्या ठाकर आदिवासी लोककलांच्या संवर्धनासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

**<u>टँकर</u>**

नाशिक जिल्ह्यात पावसाळ्याला विलंब होत असल्याने पाणीटंचाईची समस्या तीव्र झाली आहे. सध्या 1शे 74 गावे आणि 4 शे 80 वाड्या अशा एकंदर 6 शे 54 ठिकाणी 1 शे 79 टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.पाऊस आणखी लांबल्यास टँकरची संख्या वाढण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

**<u>क्रिकेट</u>**

धरमशाला इथं काल झालेल्या भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील पन्नास षटकांच्या पहिल्या सामन्यात भारताने अफगाणिस्तानचा 7 गडी राखून पराभव करत तीन सामन्यांच्या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली. पावसामुळे हा सामना 25 षटकांचा करण्यात आला होता. प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने रहमानुल्ला गुरबाजच्या आक्रमक शतकाच्या जोरावर 194 धावा केल्या. तर भारताकडून हर्ष दुबे आणि गुरनूर ब्रार यांनी प्रत्येकी तीन बळी घेतले. धावांचा पाठलाग करताना भारतीय कर्णधार शुभमन गिल याने नाबाद 84 धावांची खेळी साकारली. मालिकेतील दुसरा सामना येत्या बुधवारी लखनौ येथे खेळविण्यात येणार आहे.

**<u>हवामान</u>**

राज्यात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि विजांसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. उत्तर कोकणात वातावरण उष्ण आणि दमट राहील, तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं , नमस्कार.